**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग**
**समन्वय समिती**
**गट क सरळसेवा भरती-अराजपत्रित व गट (ब)**

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/ २७० / सन २०२४ दि. २४.०७.२०२४**

# प्रसिध्दीपत्रक

जलसंपदा विभागाच्या गट (ब) अराजपत्रित व गट -क पदाकरिता १३ संवर्गाकरिता अमरावती, संभाजीनगर, नागपूर , पुणे , कोल्हापूर , परिमंडळाच्या कागदपत्र पडताळणी याद्या दि. ०७.०६.२०२४ रोजी प्रसिद्ध करून उमेदवारांना दि. १८.०६.२०२४ ते २२.०६.२०२४ या कालावधीत कागदपत्र पडताळणी करिता बोलाविण्यात आले होते. तसेच ठाणे व नाशिक परिमंडळाच्या कागदपत्र पडताळणी याद्या दि. ०५.०७.२०२४ रोजी प्रसिद्ध करून उमेदवारांना दि. १५.०७.२०२४ ते २०.०७.२०२४ या कालावधीत कागदपत्र पडताळणी करिता बोलाविण्यात आले होते. मात्र काही उमेदवारांनी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहता न आल्याने, कागदपत्र पडताळणी साठी अतिरिक्त वेळ मागितल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना वेळ द्यावा लागला आहे.

तसेच काही माजी सैनिक, अपंग उमेदवारांच्या पात्रतेबाबत संबंधित यंत्रणांकडून दृढीकरण करून घेणे आवश्यक असल्यामुळे त्या यंत्रणांकडून दृढीकरण घेण्यात वेळ जात आहे. अन्यथा अपात्र उमेदवार निवडला जाऊन पात्र उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता राहते. या सर्व बाबी लक्षात घेऊन योग्य व पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे अंतिम याद्या घोषित करण्याचे नियोजन आहे.

| अंतिम याद्या घोषित करण्याचा नियोजित दिनांक | परिमंडळ कार्यालयाचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| २९.०७.२०२४ | १) अमरावती परिमंडळ , अमरावती<br>२) पुणे परिमंडळ , पुणे<br>३) कोल्हापूर परिमंडळ, सातारा<br>४) नागपूर परिमंडळ , नागपूर<br>५) छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर | १) आरेखक<br>२) सहायक आरेखक<br>३) कनिष्ठ वैज्ञानिक सहायक<br>४) वरिष्ठ वैज्ञानिक सहायक<br>५) कनिष्ठ सर्वेक्षण सहाय्यक<br>६) सहाय्यक भांडारपाल<br>७) प्रयोगशाळा सहायक |
| ३१.०७.२०२४ | १) अमरावती परिमंडळ , अमरावती<br>२) पुणे परिमंडळ , पुणे<br>३) कोल्हापूर परिमंडळ, सातारा<br>४) नागपूर परिमंडळ , नागपूर<br>५) छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर | १) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक<br>२) दप्तर कारकून<br>३) मोजणीदार<br>४) कालवा निरीक्षक<br>५) अनुरेखक |
| ०५.०८.२०२४ | १) मुंबई परिमंडळ, ठाणे<br>२) नाशिक परिमंडळ, नाशिक | १) आरेखक<br>२) सहायक आरेखक<br>३) कनिष्ठ वैज्ञानिक सहायक<br>४) वरिष्ठ वैज्ञानिक सहायक<br>५) सहाय्यक भांडारपाल<br>६) भू- वैज्ञानिक सहायक<br>७) प्रयोगशाळा सहायक<br>८) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक<br>९) दप्तर कारकून<br>१०) मोजणीदार<br>११) कालवा निरीक्षक<br>१२) अनुरेखक |

**(मिलिंद ज्यो. नाईक)**
अध्यक्ष
समन्वय समिती तथा
मुख्य अभियंता जलसंपदा विभाग
कोकण प्रदेश मुंबई